INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
(Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal)
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास आणि स्त्री-पुरुष समानतेचे महत्त्व : एक अभ्यास

प्रियंका शिवाजी गायकवाड

संशोधिका, एम.ए.(अर्थशास्त्र)

Email: pgaikwad1230000@gmail.com

DOI No. 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2021-36548218/IRJHIS2107018

गोषवारा :

भारत स्वातंत्र्य पूर्वी अनेक महापुरुषांनी समाज सुधारण्याच्या उद्देशाने व स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित व्हावी म्हणून सामाजिक लढे दिले. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री-पुरुष समानता वरुन व स्त्री सक्षमीकरणासाठी स्त्रियांच्या शिक्षणाला सुरुवात केली. ताराबाई शिंदे यांनी स्त्री पुरुष समानता यावर प्रखर निबंध लिहून स्त्री सबलीकरण याला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील स्त्री पुरुष समानतेचे महत्त्व पटवून देताना 'एखाद्या देशाला स्वातंत्र्याची जेवढी गरज आहे. त्यापेक्षा अधिक गरज सामाजिक समतोलाला आहे.' ती समानताही माणसा माणसातील असो वा स्त्री-पुरुषातील असो स्वातंत्र्यानंतर डॉ.आंबेडकरांनी स्त्री स्वातंत्र्याबद्दल हिंदू कोड बिलाच्या स्वरूपात संसदेत विधयेक मांडले परंतु त्याला संसदेत मान्यता मिळाली नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री-पुरुष समानता विषयी अनेक कायद्यात घटनात्मक स्वरुपात तरतूद आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचलेले स्त्री-पुरुष समानता बद्दल मार्गदर्शन हे नंतरच्या कालखंडामध्ये भारतीय संविधानात घटनात्मक स्वरूपात राज्यकर्त्यांनी आत्मसात केलेले पहावयास मिळते.

महात्मा गांधी यांनी देखील स्त्रियांच्या स्वातंत्र्य विषयी विचार मांडले आहेत. त्यांच्या मते स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांचा सहभाग प्रकर्षाने असणे आवश्यक आहे. त्यामुळे स्त्रियांच्या चळवळीचा आधार स्वातंत्र्याला एक नवा विश्वास देणारा आहे.

पारिभाषिक शब्द : *स्त्री-पुरुष समानता, सबलीकरण, स्त्री कल्याण, अर्थव्यवस्था, शिक्षण, विकास, साक्षरता*

प्रस्तावना:

आधुनिक भारतामध्ये जेवढे स्पर्धेला महत्त्व प्राप्त झाले आहे तवढेच महत्त्व स्पर्धेतील समान संधीला प्राप्त झाले आहे. स्पर्धेतील समान संधी ही समाजातील दुर्बल घटकापासून ते स्त्री-पुरुष समानता पर्यंत ठेवली आहे. आधुनिक भारतात सर्वांसाठीच समान हक्क मान्य करण्यात आले आहेत. भारतीय राज्यघटनेत समाजातील सर्व क्षेत्रात दुर्बल घटकाबरोबर स्त्री-पुरुष यांना समान संधी बहाल केली आहे.

भारत स्वातंत्र्य पूर्वी अनेक महापुरुषांनी समाज सुधारण्याच्या उद्देशाने व स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित व्हावी म्हणून सामाजिक लढे दिले. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री-पुरुष समानता वरुन व स्त्री सक्षमीकरणासाठी स्त्रियांच्या शिक्षणाला सुरुवात केली. ताराबाई शिंदे यांनी स्त्री पुरुष समानता यावर प्रखर निबंध लिहून स्त्री सबलीकरण याला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील स्त्री पुरुष समानतेचे महत्त्व पटवून देताना 'एखाद्या देशाला स्वातंत्र्याची जेवढी गरज आहे. त्यापेक्षा अधिक गरज सामाजिक समतोलाला आहे.' ती समानताही माणसा माणसातील असो वा स्त्री-पुरुषातील असो स्वातंत्र्यानंतर डॉ.आंबेडकरांनी स्त्री स्वातंत्र्याबद्दल हिंदू कोड बिलाच्या स्वरूपात संसदेत विधयेक मांडले परंतु त्याला संसदेत मान्यता मिळाली नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री-पुरुष समानता विषयी अनेक कायद्यात घटनात्मक स्वरुपात तरतूद आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचलेले स्त्री-पुरुष समानता बद्दल मार्गदर्शन हे नंतरच्या कालखंडामध्ये भारतीय संविधानात घटनात्मक स्वरूपात राज्यकर्त्यांनी आत्मसात केलेले पहावयास मिळते.

महात्मा गांधी यांनी देखील स्त्रियांच्या स्वातंत्र्य विषयी विचार मांडले आहेत. त्यांच्या मते स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांचा सहभाग प्रकर्षाने असणे आवश्यक आहे. त्यामुळे स्त्रियांच्या चळवळीचा आधार स्वातंत्र्याला एक नवा विश्वास देणारा आहे. सदरील सर्व विचारवंताचे स्त्रियांच्या समानतेबाबत सकारात्मक विचार हे स्त्रियांबाबत असणारा विश्वास दिसतो. भारतात याच पार्श्वभूमीवर स्त्री-पुरुष समानतेच्या आधुनिक काळातील गरज लक्षात घेऊन स्त्री सक्षमीकरण सर्व समाजातून मान्यता मिळत आहे. एवढेच नाही तर स्त्री कल्याण आणि विकास याद्वारे ती स्त्री सक्षमीकरणापर्यंत येऊन ती आता समाज, राष्ट्र व जगाच्या विकासाची एक महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

स्त्री सक्षमीकरणासाठी संकल्पना :

" स्त्री सक्षमीकरण याची फोड केली असता स्त्रीला तिची दुर्बलता नष्ट करणारी व स्त्रीला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करुन देणारी त्यांनी स्वतःच्या हक्कासाठी प्रवृत्त करणारी व एक कार्यक्षम कार्यपध्दती होय."

संशोधनाची उद्दिष्टये :

१. सबलीकरणाचा अर्थ समजून घेणे.
२. स्त्री सक्षमीकरण आणि आर्थिक विकासातील संबंध समजावून घेणे.
३. स्त्री सक्षमीकरण याबाबत सरकारने घेतलेल्या भूमिकाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

१. देशाच्या आर्थिक विकासात स्त्री-पुरुष समानतेमुळेच देशाच्या आर्थिक विकासाला प्रोत्साहन मिळते.
२. स्त्रियांच्या विकासावरच देशाचा आर्थिक विकास आधारित आहे.

अभ्यास विषयाची निवड :

आधुनिक भारतात सक्षमीकरणाचे महत्त्व लक्षात घेऊन आर्थिक विकास आणि स्त्री सक्षमीकरण यांच्या संबंध नव्याने तयार होत असतानाच त्याच्यामध्ये स्त्री अस्तित्वाबाबत घडणाऱ्या लाजिरवाण्या घटनेमुळे त्यांना स्वतःच्या सुरक्षेबाबत वाटणारी भीती यावरुन समानता म्हणजे केवळ कागदोपत्री समानता नसून स्त्री समानता म्हणजे काय याचा नेमका अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन निबंधात करण्यात येणार आहे त्यासाठी दुय्यम साधनांचा उपयोग केला जाणार आहे. प्रस्तुत संशोधनात विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.

भारतीय स्त्री पुरुष समानता व विकास :

संपूर्ण जगामध्ये स्त्री सक्षमीकरण विशेष चर्चा होत असतानाच प्रामुख्याने भारतातील अर्थव्यवस्थेत एकोणिसाव्या व विसाव्या शतकात मोठ्या स्वरूपात सामाजिक परिवर्तन होत आहे महिला चळवळी, क्रांतिकारी संघटना, विद्यापीठ व संशोधन केंद्रे आणि वैयक्तिक स्तरावर सकारात्मक विचार केला जात आहे. भारत सरकारने २००१ मध्ये स्त्री सक्षमीकरण वर्ष म्हणून घोषित केले. सरकार एवढयावर थांबले नाही तर १४ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर ९ मार्च २०१० ला घटना दुरुस्ती करुन एका प्रस्तावाच्या आधारे लोकसभा आणि विधानसभा मध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागा आरक्षित होण्यावर भर देण्यात आला.

भारताच्या राजकारणात बदल घडून आणला त्यामुळे केवळ भारतातील स्त्री समानतेला प्रोत्साहन मिळेल त्याच

बरोबर त्यांच्या सक्षमीकरणासाठी अधिक कार्यक्षम बनवेल भारतामध्ये आजही प्रश्न विचारला जातो की महिलांना राजकारणात आरक्षण का? आरक्षणाने त्यांचे प्रश्न सुटतील का? कारण समाजामध्ये स्त्रीबाबत दुर्गम विचारांची मोठी फळी आज देखील अस्तित्वात आहे. भारतात महिलांच्या समानतेचा प्रश्न हा देशाच्या स्वातंत्र्य पूर्वीपासून चालत आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांनी योगदान दिले आहे. माता जिजाऊ, माता सावित्री यासारख्या राष्ट्रमाता आदर्श आपल्यासमोर असताना देखील स्त्रीला मोठ्या संकटांना सामोरे जावे लागते हे खेदजनक बाब आहे.

भारत सरकारकडे लक्ष केंद्रित करुन महिलांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय स्थितीबाबत चर्चा करण्यासाठी १९७१ मध्ये एक समिती स्थापन केली होती. "Two World Equality" या शीर्षकाच्या नावाखाली १९७४ मध्ये समितीने आपला अहवाल सादर केला ज्यामध्ये स्त्रियांच्या लोकसंख्येनुसार त्यांची कार्यक्षमता वाढवण्याच्या उद्देशाने त्यांना नगर परिषद व पंचायत समितीमध्ये आरक्षण जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला. 'आरक्षणाचा अर्थ समाजातील शेर का शिकार झालेल्या लोकसंख्येच्या एका मोठ्या गटाला संरक्षण देणे होय'. भविष्यातील लोकशाहीचा महत्त्वपूर्ण भाग असेल.

महिला सक्षमीकरणासाठी किंवा स्त्री-पुरुष समानता या विषयी भारत आणि इतर शेजारी देशांच्या तुलनात्मक अभ्यास केला असता संसदेतील महिलांची संख्या अधिक आहे. इंग्लंड मध्ये ४५ टक्के नॉर्वेमध्ये ३८%, डेन्मार्क ३७%, चीन ३४%, ब्राझील ३२%, पाकिस्तान २१% पण भारतात ८% भारतासारख्या सर्वात मोठ्या लोकशाही मानणाऱ्या देशांमध्ये केवळ ८ टक्के आहे. त्यानुसार भारत हा जगाच्या १३४ व्या क्रमांकावर आहे.

भारताने तर स्त्रियांना स्वतंत्र आणि समान संधी उपलब्ध करुन दिली तर महिला घरातील कामाबरोबर सामाजिक कामगिरी देखील पार पडतील याचे महत्त्वाचे उदाहरण १९८३ च्या ७३ घटना दुरुस्तीने निदर्शनास आले आहे. ज्यामध्ये स्त्रियांचा पंचायतराज व्यवस्थेत ते ३० टक्के आरक्षणाच्या माध्यमांनी योग्य प्रकारे राज्य कारभार चालत आहे. त्यामुळे चालू काळात भारत हा 'रिपब्लिकन' याला महत्त्व देण्यात येत आहे. भारत देशात येणारे महत्त्व आणि त्यातून देशाला विकासाला मिळणारा प्रतिसाद यामुळे देशात सक्षमीकरणासाठी शब्द परवलीचा बनला आहे. भारतात वर्तमान काळात स्त्रियांच्या एकूण आर्थिक निर्देशक अंकचे विश्लेषण करत असताना वर्तमान काळात स्त्रियांची आर्थिक परिस्थिती ही सामाजिक परिस्थिती पेक्षा अधिकच बिकट असलेले आपल्याला दिसते त्याचे सर्व विश्लेषण संबंधित संशोधन निबंधात करण्यात आले आहे.

सक्षमीकरण समाजातील विविध घटकांचे योगदान :

१.सरकार २.तरुण ३.वर्ग व्यवस्था ४.समाज ५.राष्ट्रीय शिक्षण संस्था

भारतात स्त्रियांच्या संरक्षणासाठी घटनेत अनेक कायदे असतांना स्त्रीयांवर अनेक अत्याचार व त्यांचे सामाजिक, आर्थिक शोषण मोठ्या प्रमाणात होते. भारतातील स्त्री-पुरुष समानता अभ्यासताना विविध आर्थिक निर्देशक घटकांवरुन असे लक्षात येते की भारतात देखील स्त्री-पुरुष समानतेबाबत संबंधाविषयी समाधानकारक स्थिती नाही. भारतात स्त्री-पुरुष समानतेचे केवळ गोडवे गायले जातात प्रत्यक्षात मात्र परिस्थिती वेगळीच आहे. आधुनिक काळात देशाचा समतोल विकास साधायचा असेल तर स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित होणे काळाची गरज आहे. भारताने आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये काही क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे पण अर्थव्यवस्थेचा विकास मंद स्वरुपाचा आहे. विकासाची वरची पातळी काढायचे असेल तर भारतातील स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित होणे गरजेचे आहे व त्यांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात समान संधीची उपलब्धता करुन देणे गरजेचे आहे. स्त्रियांना ग्रामपंचायती ते लोकसभेपर्यंत योग्य प्रतिनिधित्त्व मिळाले पाहिजे. स्त्रियां निर्भिड असल्याकारणाने त्यांना मिळालेल्या संधीचा फायदा देशाच्या विकासाठी होणार यात शंका नाही. देशाच्या विकासाच्या 'प्राथमिकता स्त्री विकास गरजेचा आहे तर स्त्रियांची प्रथमिकता स्त्री विकास असणे गरजेचे आहे तर स्त्रियांच्या सक्षमीकरणातच देशाचा विकास एकवटला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, " एखाद्या देशाचा विकास किती झाला आहे हे त्या देशातील स्त्रियांचा विकास किती झाला आहे यावरुन ठरवता येते."

भारत सरकारने स्त्रियांच्या स्त्री-पुरुष समानता व सक्षमीकरणासाठी घेतलेले निर्णयः महिलांच्या अधिकाराबाबत राज्यघटनेत तरतूद :

१. महिलांच्या रक्षणासाठी भारतीय दंड अधिनियम पारित
२. प्रसूती काळात पगारी हक्काची रजा
३. स्त्रियांचा दर्जा विषयी अभ्यास विशेष समिती स्थापन
४. समान वेतन कायदा –(स्त्री-पुरुष समानता)
५. स्त्रियांच्या स्वतंत्र विभागाची निर्मिती
६. सती बंदी विषयी कायदा
७. राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना
८. वारसा हक्क कायदा
९. ७२ व ७३ वी घटना दुरुस्ती

वरील निर्णय सरकारने घेतले आहेत समाजा स्त्री-पुरुष समानतेसाठी सरकारच्या धोरणावर स्त्री बाबत समाजातील पूर्वग्रह काढणे गरजेचे आहे स्त्रीला देखील स्वतंत्र जीवन आहे व त्याच्या समानेची जाणीव सर्व समाजात असणे आवश्यक आहे समाजात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे तेवढेच गरजेचे आहे तरच स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित होईल आणि स्त्री आर्थिकदृष्ट्या अधिक सबळ बनेल.

स्त्री-पुरुष समानता आणि अर्थव्यवस्थेचा आर्थिक विकास : विविध अभ्यास विषयक घटका आधारे आढावा

भारतातील स्त्री-पुरुष समानतेची अवस्था व स्त्री सक्षमीकरणासाठी सरकारने घेतलेले निर्णय याबाबत विश्लेषणात्मक चर्चा :

तक्ता क्र.१ भारत आणि इतर देशातील स्त्री-पुरुष प्रमाण :
प्रति हजार पुरुषामागे स्त्री प्रमाण (२०२०)

अ.क्र.	देश	स्त्री-पुरुष प्रमाण
१	भारत	९३३
२	जपान	१०४१
३	ब्राझील	१०२५
४	अमेरिका	१०२९
५	चीन	९६४
६	ब्रिटन	१०१२
७	रशिया	११४०

स्त्रोत-WB-World Report 2020 जागतिक बँक अहवाल २०२०

वरील तक्ता भारत आणि इतर विकसित देशातील स्त्री-पुरुष प्रमाण दर्शविते भारतात इतर देशाच्या तुलनेत स्त्री-पुरुष प्रमाण कमी असलेले दिसते.

तक्ता क्र.२ भारतातील स्त्री-पुरुष प्रमाण : १९०९-२०११

अ.क्र.	वर्षे	स्त्री-पुरुष प्रमाण	वर्षे	स्त्री-पुरुष प्रमाण
१	१९०१	९७२	१९६१	९४१
२	१९११	९४५	१९७१	९३०
३	१९२१	९५५	१९९१	९२७
४	१९३१	९५०	१९९१	९२७
५	१९४१	९५५	२००१	९३१
६	१९५१	१९४	२०११	९३३

स्त्रोत- HDI मानव विकास निर्देशांक अहवाल-भारत सरकार (२०११)

वरील तक्ता स्त्री-पुरुष लिंग प्रमाण वर्षे निहाय विश्लेषित केले आहे. भारतात स्वातंत्र्या अगोदर लोकसंख्या प्रमाण प्रामुख्याने कमी असतांनाही स्त्री-पुरुष समान प्रमाण अधिक होते मात्र स्वातंत्र्यानंतर विशेषत: १९५१-२०११ पर्यंत लोकसंख्या वाढीचा दर अधिकचा असून मात्र स्त्री-पुरुषांचे समान प्रमाण मात्र घसरत आहे. ते लोकशाही प्रधान अर्थव्यवस्थेला नक्कीच लाजिरवाणे आहे. १९ व्या शतकात भारत मिश्र अर्थव्यवस्थेकडून मुक्त अर्थव्यवस्थेकडे मार्गक्रम करत असतांना स्त्री-पुरुष समानता देशाच्या विकासाला निश्चितच लाभदायक राहिल.

तक्ता क्र.३ ०-६ वर्षे वयोगटातील बालकांचे लिंग गुणोत्तर :
वर्षे निहाय ०-६ वर्षे वयोगटात दर हजार मुला मागे मुलींचे प्रमाण (१९६१-२०११)

अ.क्र.	वर्षे	०-६ वयोगट बालकाचे लिंग गुणोत्तर	एकूण स्त्री-पुरुष प्रमाण
१	१९६१	९७६	९४१
२	१९७१	९६४	९३०
३	१९८१	९६२	९३०
४	१९९१	९४५	९२२
५	२००१	९२३	९३३
६	२०११	९३७	९३१

स्त्रोत-१ Child And Women Development Ministry Report -2018
२ Economic survey 2019 Govt. of India

वरील तक्ता ०-६ वयोगटातील दरहजार मुलामागे मुलीचे प्रमाण कमी आहे. हे प्रमाण निश्चित स्त्री-पुरुष समानतेला अडथळा निर्माण करतात त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर नकारात्मक होत आहे.

तक्ता क्र.४ १५+ वयोगट स्त्री साक्षरता प्रमाण- तुलनात्मक दृष्टया पुरुष (२०१९)

भारत	स्त्री	पुरुष
८४.८	७२	८७

स्त्री साक्षरता प्रमाण देखील पुरुषाच्या तुलनेने प्रमाण कमी आहे. ज्यामुळे स्त्रियांच्या विकासाला अडथळा निर्माण होत आहे.

तक्ता क्र.५ भारतातील स्त्री-पुरुषाचे वयोगटानुसार शिक्षणाचे प्रमाण (%)

वयोगट	०-६ नर्सरी	६-१० प्राथमिक	११-१४ माध्यमिक	१५-१८ उच्च माध्यमिक
स्त्री	१८.२	२१.२०	२५.४०	३८.६४
पुरुष	६८	६२	६१	६५

स्त्रोत-Economic Survey 2018-19 Govrt. Of India

सदरील तक्ता स्त्रियांचे वयोगटानुसार शिक्षणाचे प्रमाण देखील पुरुषाच्या तुलनेने कमी असलेले दिसते. जे स्त्रिया शिक्षण संधीत अडथळा होत आहे.

तक्ता क्र.६ स्त्री साक्षरता प्रमाण वर्षे निहाय :

अ.क्र.	वर्षे जनगणना	स्त्री साक्षरता प्रमाण टक्केवारी	पुरुष साक्षरता प्रमाण टक्केवारी
१	१९५१	८.६	२७.२
२	१९६१	१५.३	४०.४
३	१९७१	२२.०	४६.०
४	१९८१	२८.५	५३.४
५	१९९१	३९.३	६४.१
६	२००१	५२.२	७५.८
७	२०११	६४.६	८२.१६

स्त्रोत-Economic Survey 2018-19 Govrt. Of India

स्वातंत्र्यानंतर स्त्रियांच्या साक्षरता प्रमाणात वाढ होत आहे. परंतु पुरुषाच्या तुलनात्मक दृष्टया कमी आहे.

तक्ता क्र.७ वयोगटानुसार स्त्रि-पुरुष रोजगार संधी (२०१८)

प्रमाण टक्केवारी एकूण रोजगार निर्मिती

वयोगट	स्त्रीप्रमाण	पुरुष प्रमाण
०-१९	३८.६	६२.४
२०.४९	४२.२	६७.८
५०-६५	३८.०७	६७.३

स्त्रोत- अर्थिक सर्वेक्षण अहवाल २०१७-१८, भारत सरकार

तक्ता क्र.८ क्षेत्रनिहाय रोजगार संधी स्त्री प्रमाण

क्षेत्र	१९५०-५१	१९९०-९१	२०१७-१८
कृषी	८४.३	७०.३	६५.२
खनिकर्म	०.३	०.२	३.८
निर्मिती	६.६	१२.७	१८.२
बांधकाम	१.३	२.९	५.३
व्यापार	२.३	७.९	११.२
सेवा	५.१	११.२	१३.२

स्त्रोत- Ministry of Child and Women Development 2018 report

तक्ता क्र०९

संघटीत क्षेत्रात स्त्रि रोजगार प्रमाण २०१७-१८

क्षेत्र	स्त्री	पुरुष
संघटीत कृषी	१८.३	२२.३
सार्वजनिक क्षेत्र	११.६	४२.२
सरकारी सेवा	१२.९	३८.४

स्त्रोत- अर्थिक सर्वेक्षण अहवाल २०१७-१८

वरील तक्ता क्रमांक ७,८ व ९ मधील स्त्रियांच आर्थिक समानते विषयी परिस्थितीचे दर्शन होत आहे. ज्यामध्ये भारतात पुरुषाचा तुलनेने सर्व निर्देशित घटकात स्त्रियांची अवस्था निम्म स्वरूपात आहे. ज्यामुळे स्त्रियांच्या समान संधीला अडथळा निर्माण होत आहे. त्याचा अप्रत्यक्षरित्या परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर नकारात्मक स्वरुपात पडत आहे.

तक्ता क्र.१० वर्षे निहाय त्रियांचे रोजगार संधी प्रमाण-

वर्षे	रोजगार प्रमाण टक्केवारी
२०१७	२२.०६
२०१८	२८.११
२०१९	३२.२१
२०२०	३४.२१
२०२१	३०.०४

स्त्रोत- आर्थिक सर्वेक्षण अहवाल २०१७-२०२१ भारत सरकार

तक्ता क्र.११

भारतात स्त्री बाबत होणारे गुन्हे-प्रमाण टक्केवारी -२०१६

गुन्हे	प्रमाण
स्त्रियांचा छळ	२८.२
विनयभंग	२१.४
अपहरण	१२.५
लैंगिक शोषण	१८.३
हुंडाबळी	७.२
इतर	१.१

स्त्रोत- गुन्हे विभाग- अहवाल भारत सरकार २०१६

भारतात सदरील आकडेवारी वरुन स्त्रियांच्या संरक्षणाबाबत देखील प्रश्न निर्माण होतो. भारतीय संविधानानुसार स्त्रियांच्या अर्थिक,सामाजिक सुरक्षेबाबत अनेक कायदे केले आहेत तरी देखील स्त्रियांवर होणारे अत्याचार हे वाढतच आहे ही खेद जनक बाब आहे. त्याचा परिणाम हा महिलांच्या आर्थिक सबलीकरणावर नकारात्मक स्वरूपात होत आहे. ज्यामुळे अर्थव्यवस्थेला त्याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहे.

संदर्भ :

1. विनोदानंन्द झा (२०१२) 'भारतातील शिक्षण व्यवस्था' योजना, महाराष्ट्र राज्य प्रकाशन
2. मदन व्ही.पी. (२०१४) 'भारतातील महिलांची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती' संशोधन पेपर

3. सोळंकी एम.के. (२०१२) भारतातील महिला आणि राजकारण योजना महाराष्ट्र राज्य शासन प्रकाशन, मुंबई
4. आर्थिक सर्वेक्षण अहवाल (२०१८) भारत सरकार
5. महिला व बालकल्याण विकास मंत्रालय, भारत सरकार (२०१८) अभ्यास अहवाल.
6. Dutta and Sundaram (2012) Indian Economy, Himalaya Publication New Delhi.
7. Mahajan D.J. (1998) Status of Women in India Stated to employment and Education, Research Paper in National Seminar.
8. Premi Mahendra (2001) The Missing girl child Article Economics Political Weekly,Vol-X page 15-18
9. Mishra & Puri (2018) Indian Economy, Himalaya Publication New Delhi.
10. www.cwdindia.com